महाराष्ट्र शासन
मृद व जलसंधारण विभाग
वाल्मी परिसर, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००२

---

**दिनांक १५.०२.२०२४**

# जाहीर सूचना

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तर व जिल्हा परिषद यंत्रणेतील जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी, आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत दि.१९/१२/२०२३ रोजी सदर पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर परीक्षा टी.सी.एस. कंपनीमार्फत दि.२० व २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी ऑनलाईन पद्धतीने, निश्चित केलेल्या विविध केंद्रांवर घेण्यात येणार असून त्याकरिता प्रवेशपत्र (Admit card) दिनांक १२/०२/२०२४ पासून उमेदवारांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एम.पी.एस.सी.) अभियांत्रिकी सेवा परिक्षा, २०२२ च्या मुलाखती दिनांक २०/०२/२०२४ ते दि.२७/०२/२०२४ या कालावधीत आयोजित केल्या आहेत. सदरहू अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २०२२ च्या मुलाखतीसाठी आयोगाच्या संकेत स्थळावर अर्हताप्राप्त ३२५ उमेदवारांची यादी दि.१२/०२/२०२४ रोजी आयोगाने प्रसिद्ध केलेली आहे.

सदर बाब विचारात घेता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी सेवा परीक्षा, २०२२ च्या मुलाखतीसाठी पात्र ३२५ उमेदवारांपैकी "जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित)" या पदासाठी आवेदन केलेल्या व आयोगाच्या मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या (Shortlisted for Interview) उमेदवारांच्या मुलाखती हया दि.२०.०२.२०२४ व दि.२१.०२.२०२४ रोजी होणार आहेत, त्या उमेदवारांच्या मुलाखतीच्या वेळापत्रकात बदल करून देणेबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास विनंती करण्यात आलेली आहे.

कृपया संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**आयुक्त तथा अध्यक्ष,**
**राज्यस्तरीय निवड समिती,**
**मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर**